# प्रेस नोट

Reader Branch

आम्ही भंडारा जिल्हयाचा पोलीस अधीक्षक पदाचा कार्यभार दिनांक 18/12/2015 ला स्विकारला. सन 2015 ते 2018 दरम्यान दाखल झालेल्या गुन्हयांपैकी चालु वर्षात सन 2018 मधील दाखल गुन्हयाची घट वाढ बाबत स्थिती खालील प्रमाणे आहे.

## महत्वाचे गुन्हे

जिल्हयात सन 2018 मध्ये **खुन** या सदराखाली 15 गुन्हे नोंद असून सर्व गुन्हे उघडकीस आणण्यात आलेले आहेत. सन 2017 मध्ये 14 गुन्हे नोंद असून सर्वही गुन्हे उघडकीस आणण्यात आले होते. चालु वर्षात मागील वर्षाचे तुलनेत फक्त +1 गुन्हयाची क्षुल्लक कारणावरुन वाढ झालेली आहे.-

सन 2018 मध्ये **खुनाचा प्रयत्न** या सदराखाली 16 गुन्हे नोंद असून 15 गुन्हे उघडकीस आणण्यात आलेले आहेत. सन 2017 मध्ये 22 गुन्हे नोंद असून सर्वही गुन्हे उघडकीस आणण्यात आले होते. चालु वर्षात मागील वर्षाचे तुलनेत -6 गुन्हयांनी घट झालेली आहे.

सन 2018 मध्ये **दरोडा** या सदराखाली 1 गुन्हा नोंद असून उघडकीस आणण्यात आलेला आहे. सन 2017 मध्ये 5 गुन्हे नोंद असून सर्वही गुन्हे उघडकीस आणण्यात आले होते. चालु वर्षात मागील वर्षाचे तुलनेत -4 गुन्हयांनी घट झालेली आहे. यामध्ये एकुण 76,900/- रु. ची मालमत्ता हस्तगत करण्यात आलेली आहे. हस्तगत मालमत्तेचे प्रमाण 59.15% आहे.

सन 2018 मध्ये **जबरी चोरी** या सदराखाली 15 गुन्हे नोंद असून 11 गुन्हे उघडकीस आणण्यात आलेले आहेत. सन 2017 मध्ये 17 गुन्हे नोंद असून 13 गुन्हे उघडकीस आणण्यात आले होते. चालु वर्षात मागील वर्षाचे तुलनेत -2 गुन्हयांनी घट झालेली आहे. यामध्ये एकुण 10,68,759/- रु. ची मालमत्ता हस्तगत करण्यात आलेली आहे. हस्तगत मालमत्तेचे प्रमाण 57.35% आहे.

सन 2018 मध्ये **घरफोडी** या सदराखाली 161 गुन्हे नोंद असून 36 गुन्हे उघडकीस आणण्यात आलेले आहेत. सन 2017 मध्ये 163 गुन्हे नोंद असून 53 गुन्हे उघडकीस आणण्यात आले होते. चालु वर्षात मागील वर्षाचे तुलनेत -2 गुन्हयांनी घट झालेली आहे. यामध्ये एकुण 12,89,525/- रु. ची मालमत्ता हस्तगत करण्यात आलेली आहे. हस्तगत मालमत्तेचे प्रमाण 12.47% आहे.

## प्रतिबंधक कार्यवाही

सन 2018 मध्ये प्रतिबंधक सदराखाली कलम 107 भादवि अंतर्गत 3257 प्रकरणांची नोंद आहे. सन 2017 मध्ये 2855 प्रकरणांची नोंद होती. यामध्ये सन 2017 चे तुलनेत सन 2018 मध्ये +402 प्रकरणांनी वाढ आहे, कलम 55ते57 मपोका अंतर्गत सन 2018 मध्ये 19 प्रकरणांची नोंद आहे. सन 2017 मध्ये 14 प्रकरणांची नोंद होती. यामध्ये सन 2017 चे तुलनेत सन 2018 मध्ये +5

प्रकरणांनी वाढ आहे. कलम 93 **मदाका अंतर्गत** सन 2018 **मध्ये** 484 **प्रकरणांची** नोंद आहे. सन 2017 मध्ये 475 **प्रकरणांची नोंद** होती. **यामध्ये** सन 2017 चे तुलनेत सन 2018 मध्ये +9 **प्रकरणांनी** वाढ आहे. एकुण प्रतिबंधक सदराखाली सन 2018 मध्ये 3925 **प्रकरणांची नोंद** असून सन 2017 मध्ये 3563 प्रकरणांची नोंद होती. यामध्ये सन 2018 मध्ये सन 2017 चे तुलनेत +362 प्रकरणांनी वाढ झालेली आहे.

दारूबंदी व जुगार विरूध्द कार्यवाही

जिल्हयात आम्ही स्वतः **आमचे अधिनस्त** असलेले विशेष पथकाकडून तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी, **पोलीस स्टेशन** अधिकारी यांचेकडून अवैध दारू व जुगार धंदयाचे समुळ उच्चाटन करण्यात येत आहे. **सन 2018 मध्ये दारूबंदी कायदयाखाली एकुण 1755 गुन्हे नोंदविण्यात आलेले असून 3,35,50,042/-** रू. **ची मालमत्ता जप्त** केली. सन 2017 मध्ये दारूबंदी कायदयाखाली एकुण 1912 गुन्हे नोंदविण्यात आलेले असून 1,72,05,453/- रू. ची मालमत्ता जप्त करण्यात आली.

महत्वाचे गुन्हे कार्यवाही

सन 2018 **मध्ये एकुण 1913 गुन्हे** दाखल असून सन 2017 मध्ये 1868 गुन्हे दाखल होते. सन 2017 चे **तुलनेत सन 2018 मध्ये गंभीर व इतर सदरात क्षुल्लक कारणावरून +45 गुन्हयांनी वाढ** झालेली आहे. वेळोवेळी येणा-या तक्रारीची दखल घेवून प्रतिबंधक कार्यवाही करण्यात येते. तंटामुक्तीचे माध्यमाने बरेच तंटे मिटविण्यात येतात. जुगार, **दारूबंदी** व इतर कायदयाअंतर्गत सन **2018 मध्ये एकुण 3459 गुन्हे दाखल** असून सन 2017 मध्ये 2997 गुन्हे दाखल आहेत. सन 2017 चे तुलनेत **सन 2018 मध्ये 462 गुन्हयांनी वाढ** झालेली आहे. अवैध दारू व जुगार व्यवसायांवर धाड टाकून समुळ उच्चाटन करण्यात येते.

LCB


# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र




०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


## तुमसर आणि ढिवरटोला येथील खुनाचे दोन्ही गुन्हे उघड

## सख्खे नातेवाईकच निघाले मारेकरी

## स्थानिक गुन्हे शाखा, तुमसर व करडी पोलीसांची कार्यवाही

दिनांक ०५/०१/२०१९ चे सकाळी ०८:०० वा. चे सुमारास पोलीस स्टेशन तुमसर येथे माहीती मिळाली की, एका तरुण इसमाचे प्रेत नेहरु ग्राऊंडचे पटांगणात पडलेले आहे या माहीतीवरुन

पोलीस स्टेशन तुमसरचे पोलीस निरीक्षक श्री. सिडाम, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र मानकर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. विक्रम साळी यांनी आपआपल्या पथकांसह घटनास्थळी भेट दिली असता त्याठिकाणी एका अंदाजे २४ वर्षीय तरुणाचा मृतदेह पडलेला होता मृतकाचे गळयावर तिक्ष्ण हत्याराने वार करुन गळा चिरुन त्यास ठार केल्याचे दिसत होते त्यावेळी मृतकाची ओळख साहील ललीत शेंद्रे वय २४ वर्षे रा. गौतमनगर १५ खोली तुमसर, ह. मु. गांधी वार्ड तुमसर अशी पटली यावरुन मृतकाची पत्नी नामे सौ. रिता साहील शेंद्रे वय २० वर्ष हिचे तक्रारीवरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे अज्ञात आरोपीतांविरुध्द अप. क्र. ०७/१९ कलम ३०२ भादंविचा गुन्हा नोंदविण्यात आला. तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीत नमुद केले होते की, तीचा पती (मृतक) हा नगर परीषद तुमसर येथे कंत्राटी सफाई कामगार म्हणुन होता व दिनांक ०५/०१/२०१९ चे सकाळी ०५:०० वा. तो घरुन कामावर निघुन गेला होता. परंतु त्याचे मृत्युस कारणीभुत कोण आणि इतक्या निर्घुनपणे त्याचा खुन कोणी केला याबाबत मृतकाची पत्नी काहीही सांगत नव्हती त्यामुळे या गुन्हयातील आरोपी कोण हा यक्षप्रश्न पोलीसांसमोर होता.

तुमसर येथील खुनाचा गुन्हा उघडकीस येण्याचे चिन्ह दिसत नसतांनाच पोलीस स्टेशन करडी हद्दीतील मौजा ढिवरवाडा येथील नदीपात्रात दिनांक ०६/०१/२०१९ रोजी रात्री एका इसमाचे प्रेत पुरलेल्या अवस्थेत मिळुन आले मृतकाचे प्रेत कुजलेल्या अवस्थेत असल्याने मृतकाची ओळख पटविण्यात पोलीसांना अडचणी येत होत्या हि माहीती करडी पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्री. कोयंडे यांनी पोलीस अधीक्षक श्रीमती विनीता साहू यांना दिल्यावरुन त्यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. विक्रम साळी आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र मानकर यांना पथकासह करडी येथे जावुन गुन्हयातील मृतकाची ओळख पटविण्याबाबत व आरोपीतांना जेरबंद करण्याबाबत निर्देश दिले त्यानुसार श्री. विक्रम साळी आणि पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र मानकर यांनी आपआपल्या पथकांसह ढिवरवाडा येथील नदीपात्र गाठुन तपास सुरु केला असता मिळुन आलेले प्रेत हे ढिवरवाडा येथील दिलीपसिंह हरीसिंह चौव्हाण वय ४८ वर्ष, याचे असल्याचे निष्पन्न झाले दिलीपसिंह हरीसिंह चौव्हाण रा. जुना ढिवरवाडा हा दिनांक ०८/१२/२०१८ पासुन घरुन बेपत्ता असल्याबाबतची तक्रार त्याचा मुलगा नामे अर्जुन दिलीपसिंह चौव्हाण यांनी दिनांक १२/१२/२०१८ रोजी पोलीस स्टेशन करडी येथे दिली होती.

सतत २ दिवसात दोन खुनाचे गुन्हे ते सुध्दा अउघड असल्याने पोलीस अधीक्षक श्रीमती विनीता साहू यांनी दोन्ही खुनाचे गुन्हे कोणत्याही परीस्थितीत उघडकीस आणुन आरोपीतांना जेरबंद करण्याचे निर्देश उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. विक्रम साळी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र मानकर, तुमसर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. मनोज सिडाम आणि पोलीस स्टेशन करडीचे ठाणेदार सहा. पोलीस निरीक्षक श्री. कोयंडे यांना दिले